**दि.२३ एप्रिल, २०२६ रोजी २२३ राहुरी व २०१ बारामती विधानसभा मतदारसंघाची पोट निवडणूक-२०२६ करिता मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण २०२६/प्र.क्र.५३/कामगार-९**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७/०४/२०२६

**संदर्भ**:- भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे प्रसिध्दीपत्रक क्रमांक ECI/PN/०३०/२०२६, दि.१५/०३/२०२६.

**शासन परिपत्रक :-**

आपल्या देशाने लोकशाही पध्दती स्विकारली असून १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांनी प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ च्या परिच्छेद १३५(बी) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये असे दिसून आले आहे की, काही संस्था/आस्थापना इ. त्यांच्या कामगारांना भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. त्यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

२. भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या प्रसिध्दीपत्रकाप्रमाणे **दि.२३ एप्रिल, २०२६** रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या २२३-राहुरी व २०१-बारामती या ०२ विधानसभा मतदारसंघाकरीता पोट निवडणूक-२०२६ घेतली जाणार आहे. सदर निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा, तसेच महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या जिल्ह्यामधील सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रितीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

I) निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना, मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

II) सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहिल (उदा. खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी, हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

III) अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्याप्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहिल.

IV) वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी/ व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

३. सदर परिपत्रक भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे प्रसिध्दीपत्रक क्रमांक ECI/PN/०३०/२०२६, दि.१५/०३/२०२६ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१७१७४७२३४६१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C9638764849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2026.04.17 17:49:24 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत** - उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. मुख्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-३२.
२. आयुक्त, सर्व विभागीय, महाराष्ट्र राज्य.
३. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
४. कामगार आयुक्त, वांद्रे, मुंबई-५१ (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
५. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, प्रभादेवी, मुंबई.
६. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वांद्रे, मुंबई (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
७. संचालक, बाष्पके, वांद्रे, मुंबई, (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
८. संचालक, नारायण मेघाजी लोखंडे, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परेल, मुंबई.
९. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, प्रभादेवी, मुंबई.
१०. प्रबंधक, औद्योगिक व कामगार न्यायालय, प्रशासकीय इमारत, मुंबई.
११. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, वांद्रे (पूर्व) मुंबई.
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई यांना व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
१३. कामगार विभागातील सर्व कार्यासने.
१४. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१६. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती कामगार-९.